

# चकवा

आनंदिनी

# चकवा

आनंदिनी

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव: चकवा

प्रकार : गूढकथा

लेखिका : आनंदिनी

मुखपृष्ठ : कनक वाईकर (परभणी)
kanak.waikar@gmail.com
Ph : 8888899126

मुद्रित शोधन : नीता आंबेगावकर (नागपूर)
neetaa26@gmail.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®
esahity@gmail.com
www.esahity.com
Published : 28 March 2015

©esahity Pratishthan® 2015

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा एकांकिका, नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

*विश्वनियंत्या*

*गूढ शक्तीला*

*हा कथासंग्रह*

*अर्पण*

---------आनंदिनी

या कथांतील सर्व नांवे, व्यक्ती आणि स्थळे काल्पनिक असून

त्यांचे कोणाही जीवीत वा मृत व्यक्तींशी साम्य आढळून आल्यास

तो केवळ योगायोग समजावा.

# एक होतं गाव



संपतराव लक्ष्मण कोल्हे, जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होते. त्यांची नेमणूक गोंदिया जिल्हाअंतर्गत देवरीच्या शाळेत करण्यात आली होती. तिथे संगणक विषय शिकविण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. संपतराव वय वर्षे ३२, अविवाहित, शिक्षण बी.एस सी. (संगणक),बी. एड देवरी सारख्या खेडेगावात राहाणे त्यांना थोडे अवघडच होते. हा भाग त्यांच्याकरता पूर्णपणे नवीनच होता. तिथे ना कोणी ओळखीचे ना कोणी जिव्हाळयाचे. शाळेत तर वेळ छान जाईल, पण त्या नंतर काय करायचे? असा विचार करत असतानाच त्यांना बसच्या वाहकाचा आवाज आला, " देवरी फाटा. पुढे देवदेवरी आसून. तेथे उतरनारे मागे यीवोन राहोन. पाचेक घड्या लागून राहिल्या फकस्त." हे बोलणे ऐकून संपतराव आपल्या जागेवरून उठले आणि आपले सामान घेऊन मागे उभे राहिले.

आजूबाजूला जंगल असलेला हा भाग सुंदर होता आणि हवेत एक वेगळाच गारवा होता. जून महिना असल्याने ढग पण दाटून आले होते. एकदाचे देवरी आले आणि गुरूजी गाडीतून खाली उतरले. पाटलांचा एक नोकर आला होता त्यांना घ्यायला.

"रामराम गुरुजी" म्हणत त्याने गुरुजींचे सामान भराभर बैलगाडीत ठेवले. गुरुजींनासुद्धा गाडीत बसायला सांगून तो त्यांच्यासोबत निघाला.

" मी गुरुडू बांगदोले. पाटलांच्या वाड्यात काम करून राह्यलो. माजे चेलू तिथेच असून सालेत." तो काय म्हणाला हे गुरुजींना काहीच कळले नाही. त्यांनी फक्त मान डोलवली.

गुरुडू त्यांच्या पुढे पाच बोटे करून म्हणाला, " खुशाबा इतक्या वर्गोत असून सालेत ."

मग गुरुजींना कळले. ' अरे देवा हा कसली भाषा बोलतो? सगळेच लोक असली भाषा बोलत असतील तर मग माझी नोकरी गेलीच म्हणून समजायचे. ' गुरुजी स्वत:शीच विचार करीत होते.

परत गुरुडू म्हणाला, " गुरुजी, एकोली मात धेनात असू देऊन की, वाड्यात जाताने आदि उजवे पाय आत टाकू. नाहीतर अपशकून समजून राहू." कसे तरी संपतरावांना कळले की, वाड्यात जाताना आधी उजवा पाय आत टाकायचा. नाहीतर अपशकून समजतात. त्यांनी वेळ मारून न्यायला म्हणून ते लक्षात ठेवले.

पाटलांचा वाडा आला. संपतराव खाली उतरले आणि आधी उजवा पाय वाड्यात टाकून त्यांनी वाड्यात प्रवेश केला. पाटील बारीक लक्ष ठेवूनच होते. सर्व पाहून ते भलतेच खुश झाले. संपतरावांच्या मागोमाग गुरुडू त्यांचे सामानही आत घेऊन आला. " नमस्कार गुरुजी. काही तरास तर न्हाय ना वं झाला हितपतूर यायला? ए, जिराप्या गूल पानी आण पितळीत. गुरुजी आल्यात." पाटील बोलले. संपतरावांचा जीव भांड्यात पडला. चला यांची भाषा समजते.

" नाही नाही पाटील साहेब, काही त्रास नाही झाला." हसतहसत संपतराव बोलले.

" आंगआसं, तुम्ही आमच्या गावाचं पावणं हाय न्हवं? म्या काय म्हंतू, आज रातच्याला हितच थांबा. मस्त जेवान जेवू, वाईच गप्पा मारू मंग निजू. मंग उद्या सकालला न्याहारी करून जावाकी तुमच्या खोलीवर. गुरुदूला लावतो तुमच्यासोबत गाडी घिवून."

" ठीक आहे." असे म्हणत संपतराव फ्रेश व्हायला गेले.

संध्याकाळचे सात साडेसात वाजले असतील. संपतराव आणि पाटील गप्पा मारत बसले होते.

" आमचा ह्यो गाव बगा लई मागासलेला हाय. पोरं साळंत जायाला न्हायी म्हनत्यात मंग त्यांचं आई बाप बी त्यांच्यावानीच हैत गैबान. पाट्वीतच न्हायीत. आता तुमी बगा इतकं शिकलेलं गुरुजी आलाय म्हनल्यावू सुद्रन गाव."

संपतरावांनी गावातली माहिती विचारली आणि पाटलांनीपण त्याची छान उत्तरे दिली. पाटलांच्या बोलण्यात एक गोष्ट मात्र आवर्जून आली की गावात बारा महिने पाण्याची टंचाई असते. त्यामुळे पाणी मात्र जरा जपून वापरावे लागते. पाटलांच्या घरी मस्त दिलखुश जेवण बनविले होते. वांग्याचे भरीत, भरली ढेमसे, पातीचा कांदा, बाजरीची भाकरी सोबत फोडणी दिलेले ताक आणि गव्हाची खीर. दोघे पोटभर जेवले. इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या.

" गुरुजी, झोपताना दाराकडं पाय करू नगा. लई वंगाळ वंगाळ सपान पडत्यात बगा." पाटील म्हणाले. "आनी एक धेनात ठिवा, आमुशेला रातच्याला गावात कंदी बी फिरकायचं नाय बगा. चेटकीन फिरतीया म्हन्त्यात. भिऊ नगा. खबरदारी म्हून सांगितलं. झोपा निवांत आता. "

सकाळी उठून संपत तयार झाला. मस्त तूप टाकलेली गरमगरम महेरी त्याला नाश्त्याला मिळाली. त्याने भरपूर नाश्ता केला. " चला पाटील, निघतो आता" असे म्हणून संपतने पाटलांचा निरोप घेतला. संपत बाहेर पडणार तोच पाटील म्हणाले, " गुरुजी, आधी दावा पाय भाईर टाका."

गुरुडू बैलगाडीतून मास्तरला खोलीपर्यंत सोडायला आला होता. खोलीवर येताच त्याने आत सामान टाकले आणि तो निघून गेला. छोटीच खोली होती. आठ बाय दहाची. वर छताला जळमटे, धूळ, किडे सर्व काही होते. संपतने खोली स्वच्छ करण्याचा निर्णय घेतला. पण लाईटचाही पत्ताच नव्हता, नव्हे तिथे कनेक्शनसुद्धा नव्हते. एकाच तासात डासांनी त्याला असे फोडून काढले की त्याचे तोंडच सुजले.

तो तसाच पाटलांकडे गेला आणि खोलीतली परिस्थिती सांगितली. पाटील म्हणाले, " गुरुजी, खोली स्वच्छ कराया म्या नोकराला धाडीन पन लायटीच काय एक म्हैना न्हाय व्हायचं बगा. "

" काय एक महिना? अशक्य. दुसरी काही व्यवस्था नाही का होणार? काही सरकारी बंगले, गेस्ट हाऊस? " संपत बोलला.

जरा चाचरत चाचरत पाटलांनी सरकारी बंगल्याबद्दल सांगितले.

" तिथे वीज आहे का?" संपत.

पाटलांनी "व्हय" म्हणताच संपतने बाकी काहीही ऐकून न घेता आपला मोर्चा सरकारी बंगल्याकडे वळविला. गुरुडू बैलगाडी चालवत होता. " गुरुजी, तुमी तिकडे नाई जाईले तर भले हुयीन. तिकडे बंगोल्यात भूता असून राह्यले जी."

संपत म्हणाला, " गुरुडू, अशी भुतं वगैरे काही नसतं रे जगात. तुला संगणकाची जादू दाखवतो. मग ठरव भुतावर विश्वास ठेवायचा का ते." गुरुडूने परत सर्व सामान बंगल्याच्या व्हरांड्यात ठेवले आणि निघाला.

संपत ओरडला, " अरे हे सामान इथेच सोडून कुठे चाललास? आत तरी ठेव. निदान या बंगल्याची किल्ली तरी आणून दे. " गुरुडू लांबूनच पळ काढत म्हणाला, " हा भूतबंगला असून मी आत नाही येऊन. किल्ली खिडकीत असून. " संपत जाम वैतागला. गावचा पाटीलच जर एवढा अंधश्रद्धाळू असेल तर मग गावातील लोकांची काय कथा. चला आपणच नेऊ सामान आतमधे. व्हरांड्यात थोडी धूळ होती आणि बाहेर अंगणात वाळलेला पालापाचोळा होता.

त्याने खिडकीत अडकविलेली किल्ली शोधली. पुढे होऊन बंगल्याचे दार उघडले आणि आत प्रवेश केला. बऱ्याच दिवसात तिथे कोणी आलेले दिसत नव्हते. आत थोडी धूळ, जळमटे होती पण फार नाही. एका तासात स्वच्छ होईल असे होते सारे. नशिबाने आत हॉलमधेच एक कुंचा होता. त्याने आधी व्हरांडा झाडून त्याचे सामान तिथे ठेवून एका कपड्याने झाकले. मग त्याने आपला मोर्चा आत वळवला. आत एकूण पाच खोल्या होत्या. चार उघड्या होत्या. पण एक खोली मात्र मोठे कुलूप लावून बंद केलेली होती. संपतने आधी फ्यूज लावला आणि लाईट आहेत का ते तपासून पाहिले. वीज होती. त्याने पटापट चारही खोल्या, बाथरूम आणि अंगण स्वच्छ केले. पाचव्या खोलीची किल्ली काही सापडली नाही. त्याने तो विषय सोडून दिला. बाहेर अंगणात एक मोठे कडूलिंबाचे झाड होते. त्याचाच पाचोळा खूप पडला होता. सारा कचरा जवळच टाकावा म्हणून तो

गेटच्या बाहेर आला. घड्याळात दुपारचे दोन वाजले होते. ऊन चांगलेच तापले होते. कचरा टाकून संपत आत वळणार तोच त्याला बंगल्या शेजारी असलेली एक विहीर दिसली. तिच्या भोवती संपूर्ण तारांचे कुंपण घातले होते आणि काटेसुद्धा लावले होते.

तो ते न्याहाळतच होता तितक्यात एक तरूण त्याच्याकडे धावतधावत आला. त्याला धावून दम लागला होता. धापा टाकीत तो म्हणाला, " तुम्ही .... या.... या... इथे राहायला आलात? "

संपत आधीच चिडलेला होता तरीही स्वत:ला सावरत तो शांतपणे म्हणाला, " हो. काही अडचण? आणि हे विचारणारे आपण कोण ?"

तो तरूण आपला श्वास नॉर्मल होईपर्यंत थांबला आणि मग बोलू लागला. " मी... मी... सदा. सदानंद बरुचे. या बंगल्यात भूत आहे असं ऐकलं होतं. मग तुम्हाला हे कोणी सांगितलं की नाही ते पाहायला आलो होतो."

संपत अजून चिडलेल्या स्वरात बोलला, " हे पाहा सदानंदराव, आपण मला सावध केलंत . मी आपला खूप आभारी आहे. पण तुम्ही या आता. "

यावर सदा आश्चर्याने डोळे विस्फारून म्हणाला, " आईगो, म्हणजे तुम्ही घाबरत नाही अजिबात कशालाच?"

आता थोडा स्वर उतरवून संपत उत्तरला, " असं नाही सदानंदराव, भीती तर सगळ्यांनाच वाटते. पण माझा भुतावर विश्वास नाही. त्यामुळे कोणीही कितीही सांगितलं ना तरी मी इथे राहाणार."

हे ऐकून सदा आनंदाने म्हणाला, " द्या टाळी. साहेब अखेर या आख्ख्या गावात कुणीतरी भेटलाच मला माझ्यासारखा विचार करणारा. " माझा तर अजिबात विश्वास नाही या गोष्टीवर. पण या गावातले लोक आणि ते पाटील अंधश्रद्धेचा कळस आहेत कळस. ' असा पाय टाका' , ' तो हात लावा.' ' इथे पाहू नका', तिकडे जाऊ नका.' अमावास्येला गावात फिरकू नका.' झीट आली आहे साहेब हे ऐकून ऐकून. " आता संपत पूर्ण शांत झाला होता.

" खरं आहे तुमचं. पण तुम्ही नक्की आहात कोण?" बोलण्यावरून तर इथले वाटत नाही."

" मी मूळ उस्मानाबादचा. इथे समाज सुधारक म्हणून आलो होतो एका संस्थेकडून." पण पोटपाणी भागवण्यासाठी थोडीफार कामं करतो आजूबाजूच्या गावात. इथे सहसा कोणी दिसत नाही. जागेचा महिमाच तसा आहे ना. आज तुम्हाला पाहिल्यावर जरा विशेषच वाटलं."

संपत - " बरं झालं तुम्ही भेटलात. या ना आत या. आत बसून बोलू या." असे म्हणून दोघेही आत गेले. सदा - बापरे साहेब, चांगलं भलं मोठं आहे की हे घर आतून पण आणि तुम्ही साफसफाईपण केलेली दिसते ."

" होय बाबा, आलो की पहिलं तेच काम केलं मी."

" मी तर इथे समाजसुधारक म्हणून आलो होतो पण तुम्ही इथे कशासाठी आलात?"

" अहो, मी येथे संगणक शिक्षक म्हणून आलो आहे. " अर्थात मला या वर्षीच नवी नोकरी लागली आहे. त्यामुळे मग इकडे यावं लागलं " नाहीतर मी मूळचा तसा नाशीकचा आहे. कालच आलो इकडे या गावात. रात्री पाटलांकडे मुक्काम होता. आज सकाळी माझ्यासाठी नियोजित केलेली खोली पाहिली आणि इकडे पळ काढला. तो गुरुडू म्हणत होता की, इकडे भूत वगैरे आहे पण मी काही त्याचं जास्त मनावर घेतलं नाही."

" मग तुमच्या जेवणाखाण्याची काही व्यवस्था?"

" अजून तरी काही नाही. आज कुठेतरी बाहेर खाईन आणि उद्यापासून बनवेन माझं मीच."

" आज माझ्या घरून आणू का तुम्हाला काही जेवायला? म्हणजे माझी बायको चांगलं जेवण बनवते."

" नको अहो, माझ्यामुळे तुम्हाला त्रास कशासाठी?"

" त्रास कसला त्यात साहेब? एकतर किती दिवसांनी कोणीतरी माझ्यासारखा माणूस मला भेटलाय. माझी सेवेची संधी घालवू नका."

" बरं ठीक आहे. आणा आज दुपारचं आणि संध्याकाळचं जेवण. मी उद्या बनवेन."

" आता आणतो." सदा गेला. तो पर्यंत संपतने स्वच्छ आंघोळ केली आणि सामान जागेवर लावले. बंगल्यात थोडेफार फर्निचर होते. किचन टेबल, डायनिंग टेबल, कपाट, हॉलमधे टेबल, सोफा आणि बेडरूममधे बेड. किचनमधे एक स्टोव्ह होता. पण त्यात रॉकेल नव्हते. संपतने सामानाची यादी केली. तूर्त त्याच्याजवळ एक आठवडा स्वयंपाक बनवता येईल एवढे सामान होते. सदा घरून गरमगरम भाकरी आणि शेपूची घेऊन आला. संपतने बोटे चाटत सारे फस्त केले. त्याने सदाचे आभार मानले. संध्याकाळी परत येतो असे सांगून सदा निघून गेला. तोपर्यंत लागेल ते सामान म्हणजे दूध, चहा , साखर, रॉकेल, आगपेटी, मेणबत्ती, साबण तो दुकानातून घेऊन आला.

संध्याकाळ होताच सदा परत हजर झाला. तो पर्यंत संपतने घरात दिवा बत्ती केली होती.

" या या सदानंदराव. तुमचीच वाट पाहात होतो."

" साहेब एक सांगू का? मला तुम्ही सदा म्हणूनच हाक मारा. मला तेच गोड वाटतं. "हातातली कागदाची गुंडाळी संपतकडे देत सदा म्हणाला. संपतने " ठीक आहे" असे म्हणून हसून मान डोलावली.

" सदा, तू मात्र मला एक चांगला साथीदार भेटलास इथे. तुझं काम कसं चाललं आहे ते सांग."

" मी तुम्हाला गुरुजी म्हणालो तर चालेल का?"

" हो. बिनधास्त म्हण."

" गुरुजी, आम्हाला संस्थेत शिकवलं होते की समाजात सुधारणा होईल अशा गोष्टी करा. तंटे सोडवा. लोकांना गरजेपुरतं शिक्षण द्या. त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करा. मुलींची लग्नं लवकर करण्यापासून लोकांना परावृत्त करा. अंधश्रद्धा, बळी यापासून परावृत्त करा. हे सगळं काम मी करत होतो. "

" करत होतो म्हणजे? आता नाही करत?"

" करतो. पण शेजारच्या गावात. इथे नाही. "

" का? इथे का नाही करत आता?"

" गुरुजी इथे खूप अंधश्रद्धाळू लोक राहातात. इथे एक बुवा पण आहे. त्या बुवावर पाटलांचा खूप विश्वास आहे. तो त्याचं थोतांड लोकांसमोर मांडतो आणि या गरीब लोकांच्या भावनांशी खेळून त्यांच्याकडून पैसे उकळतो. असंच एका गरीब शेतकऱ्याला त्याने सांगितलं की तुझ्या मुलीचं लग्न व्हावं असं वाटत असेल तर तुला तुझ्या बायकोचा बळी द्यावा लागेल. नाहीतर तुझी सगळी जमीन आम्हाला दान द्यावी लागेल. योगायोगाने मी तिथेच होतो. मग मी विचारलं त्या ढोंगी बुवाला की, या मुलीचं लग्न व्हायला काय अडचण आहे? तर म्हणाला हिच्या पत्रिकेत मंगळ दोष आहे. मग यांची बायको बळी गेली किंवा यांनी यांची जमीन दान दिली तर तो दोष कसा नष्ट होईल ते जरा उलगडून सांगा. असं म्हणताच तो बुवा त त प प करू लागला. ते तुला नाही कळणार मूर्खा असे बुवा माझ्या अंगावर खेकसला. मी त्या क्षणी त्या मुलीच्या कपाळी कुंकू लावून तिच्याशी लग्न केलं तर बुवाचा स्वाभिमान दुखावला गेला म्हणून त्याने गावातील लोकांना फितवलं की आम्ही पाप केलं आहे त्यामुळे गावावर मोठं अरिष्ट ओढवणार आहे. मग आम्हाला गावातील लोकांनी गावा बाहेर काढलं. आम्ही दोघं इथे जवळच राहातो एकां खोपटात. "

" अरे अरे, फार वाईट झालं. आता सांग या बंगल्याला भूतबंगला का म्हणतात?"

" गुरुजी हा बंगला त्या पाटलाला हडप करायचा आहे. त्यात एक बंद असलेली खोली आहे न तिथे पाटलाने आपलं धन लपवलं आहे. आणि ती विहीर आहे ना? तिला बारा महिने पाणी असतं. गावात कायम पाण्याची टंचाई असते. या विहिरीतून एक मोठी पाईप लाईन पाटलाच्या वाड्यात जाते. विहिरीचं पाणी इतर कोणी वापरू नये आणि

या पाईप लाईनबद्दल कोणालाही कळू नये म्हणून तिला असं कुंपण घातलं आहे. गावातील सर्व मूर्ख लोकांनी यावर विश्वास ठेवला की, ही विहीरपण भुताटकीची आहे. आपण किती महान हे दाखवण्यासाठी पाटील गावातील लोकांना रोज तीन तीन घागरी पाणी देत असतात. असा प्रकार आहे सगळा गुरुजी."

" अरे पण पाटलाचा एवढा मोठा वाडा असताना त्याला हा बंगला का हडप करायचा आहे?"

" गुरुजी, पाटलांचा चोरीचा पैसा त्यांना कधीकधी इथे लपवावा लागतो."

" अरे पण पाटील कशाची चोरी करतात आणि का?"

" खूप लहान मोठे धंदे आहेत पाटलांचे. सरकारने बंदी केली तरी जंगलातलं लाकूड विकतात."

" अस्सं काय ! भलताच चालू माणूस दिसतो हा पाटील."

गप्पा मारत गुरुजींनी आणि सदाने जेवण केले. रात्री दहा वाजता सदा आपल्या घरी परतला. संपतने मस्त झोप काढली आणि सकाळी उठून फ्रेश झाला. चहा प्यायला. तो पर्यंत परत सदा आलाच.

सदा आता रोजच येऊ लागला होता. संपतची आणि सदाची छान जोडी जमली होती. सदा गावातल्या एकेक गमतीजमती संपतला सांगत असे. अशातच शाळा चालू झाली. मुलांचे पालकही संपतला सांगू लागले की तो बंगला भुताचा आहे तेथे राहू नये. विहीर भुताची आहे. कित्येकदा संपतच्या मनात आले की लोकांसमोर पाटलांचे पितळ उघडे पाडावे. पण त्याच्याकडे काही पुरावे नव्हते. ते काही नाही लोकांच्या मनातून आधी अंधश्रद्धा दूर करू आणि मग त्यांना विश्वासात घेऊन पाटलांचे पितळ उघडे करू .

दुसऱ्या दिवशी अमावास्या होती. पाटलाने सांगितले होते की आमुशेला गावात फिरायचे नाही. लोकांनीसुद्धा सांगितले, " गुरुजी उद्या आमुशा आहे. राती गावात फिरायचं नाय. ते भूत राती इथे फिरत असतं आणि त्याला जो आवडेल त्याला ते पळवून नेतं."

संपत हसत " ठीक आहे." म्हणाला. त्याला या मागचा पाटलाचा कपटी हेतू शोधायचा होता. त्याने सदाला तसे सांगितले, सदा म्हणाला, " ठीक आहे. आपण दोघं उद्या रात्री संपूर्ण गावात फिरू."

संपतने शंका व्यक्त केली " अरे पण तुला गावात यायला बंदी घातली आहे. कोणी पाहिले तर उगीच अडचण नको. जाऊ दे."

हसत सदा म्हणाला , " गुरुजी, उद्या गावात रात्रीचं कुत्रं तर सोडाच पण पाखरूही दिसणार नाही तुम्हाला. तर मला पाहायला कोण येतंय तेव्हा? चला आपण नक्की जाऊ.माझं पण अर्धवट राहिलेलं काम पूर्ण होईल."

दुसऱ्या दिवशी रात्री अकरा साडेअकराच्या सुमारास दोघे गावात निघाले. गावात पूर्ण काळोख होता. सदाने सांगितल्याप्रमाणे कोणीच रस्त्यावर नव्हते. संपतने खिशात बॅटरी घेतली होती. चालताचालता सदा सांगत होता, " गुरुजी, अमावास्येला म्हणे भूत कोणाच्या तरी दारावर फुली मारतं आणि तो माणूस मग गायब होतो गावातून. " हे ऐकून संपतची कानशिले गरम झाली. तो म्हणाला, " म्हणजे पाटील लाकडांबरोबर माणसांचीही तस्करी करतो."

" मला पण अशीच शंका आहे गुरुजी," सदा म्हणाला.

रातकिड्यांचा किर्र आवाज येत होता. एक साधा दिवासुद्धा कुठे तेवत नव्हता. गडद काळोख होता. गावाच्या मध्यभागी आल्यावर कोणीतरी चालत येताना दिसले. ती एक मोठी धिप्पाड आकृती होती. आधी संपत घाबरला. " चेटकीण?" त्याच्या तोंडातून आपसुक निघून गेले. पण सदा कुजबुजला " गुरुजी भ्यायचं काहीच कारण नाही. कोण आहे ते नीट पाहू या. "

ती आकृती जशीजशी जवळ येत गेली तशीतशी तिच्या पायातील चप्पल करकर वाजते आहे हे स्पष्ट जाणवले. घुंगरांचा आवाजही येऊ लागला. " सदा अरे तू आडोशाला लप. उगाच कोणी तुला पाहिले तर गडबड होईल." संपत घाईत म्हणाला. त्या प्रमाणे सदा पटकन झाडाच्या मागे लपला. ती आकृती जशी संपतच्या जवळ जवळ येत होती तसा घुंगरांचा आवाज स्पष्ट येत होता. भली मोठी धिप्पाड आकृती, हातात काठी,

संपूर्ण अंगावर काळे घोंगडे पांघरले होते. काठीला घुंगरू बांधले होते. आता ती आकृती संपतच्या बरोबर समोर उभी होती. फक्त एक फूट अंतरावर. तिने काठी जोरात जमिनीवर आपटली. तशी खणकन घुंगरं वाजली. आणि ती आकृती अंगावरील घोंगडे बाजूला करून म्हणाली,

" गुरुजी सांगितलं व्हतं न्हवं अमुशेला रातच्याला गावात फिरायचं नाय. तरीबी तुम्ही आईकलं न्हाय. मरायचं हाय का?"

संपत थोडा घाबरला होता पण त्याने तसे अजिबात न दाखवता आकृतीच्या चेहेऱ्यावर एकदम बॅटरीचा उजेड पाडला. तशी ती आकृती दचकली. ती आकृती म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून गावचे पाटील होते.

" पाटील तुम्हीच असणार वाटलंच होते मला. तुम्हाला काही नाही करत वाटतं भूत?" संपतने कुत्सितपणे विचारले.

पाटील गळयातील ताईत दाखवून वरच्या आवाजात म्हणाले," मला कुठलंच भूत काय करू शकत नाय. ह्यो बुवांनी दिलेला ताईत हाय गल्यात माज्या. पण तुमी लई उडू नका. तरूण रक्त तुमचं लई सळसळू देऊ नका. आता निगा आपल्या घरला." आणि पाटील तरातरा पुढे निघून गेले. पाटील जाताच सदा बाहेर आला. दोघे एकमेकांना टाळी देऊन हसू लागले.

" अरे हा, तू त्या फुलीबद्दल काय सांगत होतास?" संपतने विचारले. " गुरुजी ते भूत म्हणे कोणाच्यातरी दारावर फुली मारतं आणि मग तो माणूस दुसऱ्या दिवसापासून गावातून नाहीसा होतो." सदा म्हणाला, "

संपत म्हणाला, " पाटील सरळ गेला आहे. चल आपण इथेच कोणाच्यातरी दारावर फुली मारू आणि पाटालाच्या मागेमागे जाऊन त्याने जर कुठे फुली मारली असेल तर ती पुसून टाकू. मजा येईल. " सदा " ठीक आहे" म्हणाला. " पाटलाने तस्करांना सांगून ठेवले असेल कोणते घर ते. आपण त्याची खूण मिटवू. " तिथे जवळच गुरुडूचे घर होते. सदाने पटकन गुरुडूच्या घरावर फुली मारली आणि दोघे भराभर पाटलाच्या मागे गेले. पाटील गावाला वळसा घालून वाड्यावर निघून गेले. कोणत्याही घरावर फुली दिसली नाही.

" गुरुजी, बहुतेक पाटलाला अंदाज आला असेल की आपण त्याच्या मागे मागे जातोय म्हणून त्यामुळे त्याने फुली मारलीच नसेल." दोघेही हसतहसत बंगल्यावर परत गेले. सदा आपल्या घरी परतला.

दुसऱ्या दिवशी गावात गलका झाला. "गुरुडू गायब झाला, गुरुडू गायब झाला. गुरुडूच्या घरावर फुली होती. "सदा, तो पाटील किती नीच माणूस आहे रे, त्याने त्याच्या इतक्या प्रामाणिक नोकराला, गुरुडूला पण सोडलं नाही. "

सदा हसतहसत म्हणाला, " गुरुजी दिसतो तितका सरळ नाही तो पाटील. त्याने आपला डाव आपल्यावरच उलटवला ."

" हो. पण आता त्याला पकडायचं कसं? काहीतरी प्लान बनवायला हवा रे सदा आणि तोही लवकर."

" गुरुजी पण आता पुढच्या अमावास्येपर्यंत तर काहीच शोधता येणार नाही आपल्याला. बाहेरूनच काही माहिती मिळते का ते पाहायचं. शिवाय तुमची शाळा पण असते नाही का?"

" होय रे सदा. ठीक आहे. पाहू या कसं काय होतं ते."

त्यानंतर गुरुजींची आणि सदाची चांगलीच गट्टी जमली. सदा रोज मोहिनीकडून, म्हणजे त्याच्या बायकोकडून गुरुजींसाठी जेवण बनवून आणे. संपत मात्र न चुकता त्याचे पैसे देत असे. हळूहळू दोघांनी गावातील बुवावर लक्ष ठेवायला सुरुवात केली. त्यांच्या लक्षात आले की, हा बुवा उगाचच गावातील लोकांकडून पैसे, सोने, धान्य, कोंबड्या,जमिनी लुटत असे. शिवाय एकट्या राहाणाऱ्या बायकांवर वाईट नजर ठेवत असे. एकदा गुरुजींनी झाडामागे लपून पाहिले, गुरुडूची बायको ठोसाई, बुवांकडे गुरुडूबद्दल

विचारायला गेली होती. ती बुवांना विचारात होती की गुरूडू कोणत्या दिशेला असेल, कसा असेल, घरी कधी परतेल. बुवां ढोंगीपणाने तिचा हात पाहाण्याच्या बहाण्याने तिला स्पर्श करण्याचा प्रयत्न करत होता. पुढे बुवाने दिलेल्या उत्तराने तर संपत चकीतच झाला.

"ठोसाई मला सांग, कुंच्या वक्ताला गुरुडू घरातून गायब झाला? "

" महाराज, त्ये न्हवं का त्या दिशी आवस हुती . रातच्याला उटलं होतं बाहेर जायाला. परसाकडं गेलं असत्याल. पन माघारीच आलं न्हायीत. कोंबडं आरावल्यावर म्या बगाई गेले तर फकस्त टरमालं हुतं. लई हाका मारल्या. पण काय बी उपेग झाला नाय. मंग मी माघारी आल्यावू बघती तर काय आवो, दारावर फुली व्हती." आणि ती रडू लागली.

"ठोसाई, रडू नगस. तू काय बी कालजी करू नगस. ज्या वक्ताला गुरुडू गायब झाला ना त्याच वक्ताला मी तुज्या घरी यितू आज रातच्याला आणि अधिष्ठान करतू. त्या भुताला गुरुडूला माघारी पाठवावाच लागल. तू फकस्त दोन भाकरी, दोन उकाडलेली अंडी, आन एक बाटली तयार ठीव. पोरांना बी झोपव. आण म्या येणार हाय हे कोनाला अजाबात सांगायच नाय. जर भुताला कळलं ना तर गुरुडू माघारी येणार नाय."

" व्हय व्हय महाराज, म्या तुमची वाट बगन."

संपतला बुवाच्या डोळ्यातले भाव स्पष्ट वाचता येत होते. त्याने ठरवले, आज बुवाचा बुरखा फाडायचा. तो तातडीने घरी गेला. दुपारी सदा जेवण घेऊन आला. पाहिलेला सर्व प्रकार संपतने त्याला सांगितला. दोघांनी मिळून बुवाला पकडायची योजना बनवली.

रात्री बुवा ठोसाईच्या घरी गेला. सर्व गाव चिडीचूप शांत होते. संपत आणि सदा गुपचूप जाऊन गुरुडूच्या घराच्या भिंतीच्या मागे लपले. आत प्रवेश करताच बुवाने दार लावून घेतले. हे दोघे खिडकीतून पाहात होते. बुवाने समोर दोन तीन दगड मांडले. त्यापुढे एक काळे बाहुले ठेवले. टाचण्या लावून लिंबे ठेवली. काहीबाही मंत्र म्हणू लागला. त्याने भाकरी, अंडी आणि बाटली त्या दगडासमोर ठेवली. नंतर झोळीतून कसली तरी एक पुडी काढली आणि ठोसाईला खायला दिली. नंतर भाकरी, बाटली आणि अंडी स्वत: फस्त केली. ती पुडी खाऊन ठोसाईला गुंगी येऊ लागली होती. तिला गुंगी येऊ लागताच बुवाने घाणेरडे चाळे सुरू केले. " ठोसे, ए ठोसे, मी तुझा गुरुडू आलोय. माघारी बग जरा. "

गुंगीमुळे ठोसाईला तिच्यासोबत काय होते आहे ते कळत नव्हते. संधी साधून संपत आणि सदाने दार उघडले आणि बुवाला फरपटत बाहेर आणले. बुवा जाम घाबरला.

" गुरुजी माझं बिंग फोडू नका. मी इथून पुढं असं करनार न्हाय. म्या जातो जातो."

संपत जोरात ओरडला, " थांब रे बुवड्या, गुरुडू कुठाय ते सांग आधी.

" बुवा गयावया करत म्हणाला," मला न्हाय म्हाईत गुरुदू कुटाय ते. " आणि त्याने तिथून पळ काढला.

नंतर एक अर्धवट पण विलक्षण समाधान घेऊन संपत सदाबरोबर बंगल्यावर परतला.

दिवसामागे दिवस जात होते. परत अमावास्या आली. रात्री परत तोच कार्यक्रम ठरला. निघाले दोघेही बरोबर. नेहेमी प्रमाणे सारे गाव चिडीचूप होते. सर्वत्र काळोख. संपत आणि सदा दोघेही गावात फिरत होते. परत समोर पाटील दिसले. दोघांनी मस्त प्लान केला होता. परत सदा लपला. पाटील परत तसेच ओरडले. सगळे काही अगदी मागच्या अमावास्येप्रमाणे घडत होते. पाटील पुढे गेल्याबरोबर दोघांनी आपला मोर्चा पाटलांच्या घराकडे वळवला आणि पाटलांच्या घरावर फुली मारली. दोघेही एकमेकांच्या हातावर टाळी देऊन तिथून पसार झाले आणि आपापल्या घरी गेले. संपत सकाळी उठला. आवरून तयार झाला. त्याला शाळेत जायचे होते.

तेवढ्यात गावात दवंडी पिटल्याचा आवाज आला. "ऐका हो ऐका, काल रात्रीपासून आपल्या गावचे पाटील गायब झाले आहेत. कुठे आढळले तर लगेच कळवा. सांगणाऱ्याला बक्षीस मिळेल." संपतने ऐकले. तो स्वत:च्या मनाशी विचार करू लागला "काय चलाख माणूस आहे हा. स्वत;च्या फायद्यासाठी काय काय खेळी करेल सांगता येत नाही. बुवाने कान भरले असतील त्याचे."

शाळेत कसाबसा वेळ गेला. घरी येताना संपतला वाटेतच सदा भेटला. " लक्षात आला का पाटलाचा खेळ? आपण त्याचे बिंग फोडू नये म्हणून कसा डाव टाकतोय बुवासोबत मिळून."

" हो रे सदा, खरं आहे तुझं म्हणणं. आपण आता पोलिसांची मदत घेऊ. " सदालाही ते पटले. दुसऱ्या दिवशी सकाळीच संपतने पोलीस चौकी गाठली. इन्स्पेक्टर देवकर यांना त्याने सगळी हकीगत सांगितली. त्यांनी संपतला मदत करायचे ठरवले. संपतने सदाला ही गोष्ट सांगितली. पाटलांचा वाडा आणि बुवा याच्यावर पोलिसांचे बारीक लक्ष होते. काही पोलीस आजूबाजूच्या जंगलातही पाठवण्यात आले होते. त्यांचे रोज बोलणे होऊ लागले.

असाच अजून एक महिना गेला. आता दोन दिवसांवर परत अमावास्या होती.

“साहेब अमावास्येच्या काळोखाचा आणि लोकांच्या अंधश्रद्धेचा गैरफायदा घेतात हे लोक आणि लोकांच्या भावनांशी खेळतात.." संपत देवकरांना सांगत होता. आज संपतच्या घरावर फुली मारायचा संपतचा आणि सदाचा प्लान होता.

" संपतराव तुम्ही घरीच थांबा." इन्स्पेक्टर देवकर म्हणाले. " मी इथे पहारा देतो. काही हवालदार मी गावात पाठवले आहेत."

संपत " ठीक आहे." म्हणाला. तेवढ्यात सदा आला. " अरे सदा, तुला त्यांनी आत सोडलं? मला म्हणाले की कोणालाच आत सोडणार नाही म्हणून. काय रे सदा तुला काय वाटतं? आता माझ्या दारावर फुली आहे तर कोण येईल?" सदा म्हणाला," आज कोणीच येणार नाही कारण पाटलाला सुगावा लागला असणार इथे पोलीस आहेत याचा, १००% सांगतो." आज सदा पहिल्यांदाच गुरुजींसोबत थांबणार होता.

सदा आज तू जेवण नाही आणलंस का रे? मला खूप भूक लागली आहे. "

"तेच सांगायला आलो इथे. मोहिनी म्हणाली की तुमचं आज गुरुजींच्या घरावर फुली मारायचं ठरल आहे. मग ते घाबरून तिथे नीट जेवणार नाहीत. शिवाय तिथे

पोलीसपण असतील. एवढ्यांचा स्वयंपाक मला नाही जमणार. त्यापेक्षा त्यांना इथे आणा, पोटभर जेवायला घाला आणि मग परत सोडून या. "

संपतला ते पटले नाही. "नको रे इथून बाहेर पडलो तर कोण येणार आहे ते कळणार नाही. मी खाईन काहीतरी असंच."

सदा आतून बंगला पाहात होता. " गुरुजी, हेच ना ते बंद दार? किल्ली कुठाय?"

सदा कुलूप हातात धरून विचारू लागला. " माहिती नाही रे." पूर्ण घरात कुठेच नाही. मी सगळीकडे पाहिलं." संपतने उत्तर दिले. सदा हसत म्हणाला," इथेच कुठेतरी असणार आणि काखेत कळसा आणि गावाला वळसा असं होणार." आणि दोघेही हसले.

हसताना कुलपाला सदाचा धक्का लागला आणि कुलपातूनच किल्ली खणकन खाली पडली. दोघेही एकमेकांकडे विस्मयचकीत होऊन पाहात राहिले. सदाने घाईने किल्ली उचलून घेतली. संपत पण त्याच्या जवळ आला. दोघांनी एकमेकाला डोळ्यांनी सहमती दाखवत दरवाजा उघडण्याचे ठरवले. सदाने थरथरत दार उघडले. आत अंधार होता. सदाने अंदाजाने बटन दाबून तिथला लाईट लावला. ती खोली खूप मोठी होती. दोघेही आत गेले. दरवाजातून आत जाताच सदाने दार बंद केले. आत मोठे सोफे, खुर्च्या होत्या. इतके दिवस बंद असूनही खोली मात्र स्वच्छ होती. मग ते दोघे तिथेच जरा वेळ बोलत बसले. एक दीड वाजता संपत म्हणाला, " चल सदा, पोलिसांना कोणीतरी नक्कीच सापडलं असणार." "पाहू या चला. " असे म्हणत सदा उठला. बाहेरच्या दारापर्यंत दोघे आले. तर संपतला काहीतरी विचित्र जाणवू लागले. तिथे दारच नव्हते. फक्त भिंत होती. " अरे सदा, इथे दार होतं नं ? की दुसरीकडे ? माझ्या लक्षातच येईना आपण कोठून आत आलो?" असे विचारत संपत मागे सदाकडे वळला. तिथे सदा नव्हता.

"सदा... सदा ..." काहीच आवाज नाही. अरे देवा कुठे गेला हा? संपत सदाला शोधायला परत मागे गेला. तर मागेसुद्धा भिंत. चारही बाजूंना भिंत आणि फक्त भिंत. ना खिडकी ना दार. बंदिस्त खोली. " हे काय विचित्र. आत्ता तर इथे सोफे, खुर्च्या होत्या. सदा होता. " संपत पुटपुटला. " हा हा हा हा भयानक हसत सदा संपतसमोर आला.

" आलास होय, केवढा घाबरलो होतो मी. अरे चल ना लवकर. दार कुठे आहे बाहेर जायला? आपल्याला चकवा बसला वाटतं. "

परत तशाच भयानक आवाजात हसत सदा बोलला, " गुरुजी, आपल्याला नाही, तुम्हाला चकवा बसला. इथे फक्त आत येण्याची वाट आहे. बाहेर जाण्याची नाही." त्याने असे म्हणताच अजून काही हसण्याचे आवाज आले. ते होते गुरुडूचे आणि पाटलांचे. आता ते संपतला दिसायला लागले. " मग आता बाहेर कसं जायचं?" संपत घाबरून बोलला.

सदा क्षणात भिंतीच्या आरपार निघून गेला आणि परत तसाच आत आला आणि म्हणाला,

" काय करणार गुरुजी, माझा नाइलाज होता. आज तुमच्या घरावर फुली होती ना?"

# चकवा



' श्री. देवदत्त सरदेशमुख, भूगर्भ उत्खनन प्रमुख अभियंता , देशमुख वाडी, जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य.' असे त्या सरकारी पाकिटावर लिहिले होते, जे देवदत्तच्या घरी पोस्टाने आले होते. देवदत्त सरकारी खात्यात काम करीत होता. घरचा गडगंज श्रीमंत पण त्याला भूगोल आणि उत्खनन यात जिवापलीकडे रस असल्याने त्याने ही नोकरी स्वीकारली होती. त्या पाकिटात उत्खननाची नवीन साईट ' भयाणवाडी, जिल्हा औरंगाबाद' असे लिहिले होते. देवदत्तने लगेच जायची तयारी केली.

श्री. विक्रांतराव सरदेशमुख, देवदत्तचे परमपूज्य वडील. गावचे देशमुख. डोक्याने अतिशय तापट पण मनाने अत्यंत मायाळू. आई सौभाग्यवती मणिकर्णिका सरदेशमुख, कोल्हापूर संस्थानचे भोसले यांची मुलगी. अतिशय खानदानी आणि घरंदाज स्त्री. देवला अजून एक भाऊ होता राजदत्त आणि एक बहीण राजलक्ष्मी. तिचे लग्न झाले होते. मध्यप्रदेशच्या श्री. धनंजयराजे शिंधियांच्या सोबत तिचा विवाह झाला होता. एकूणच खानदानी लोक. देवदत्तच्या आईला त्याच्या या फिरण्याचा राग येत असे. त्याने घरी बसून

शेती आणि बागा बघाव्यात ही तिची तळमळ असे. त्या कधीकधी रागात म्हणत असत, " आम्हांस तर देवदत्तराजेंची भीती वाटते की कधीतरी एखाद्या उत्खननाजवळच्या गावातील, कोणतेही उच्च खानदान नसलेली मुलगी आणून आमच्या समोर सूनबाई म्हणून उभे करतील." देवदत्त हसून ही गोष्ट उडवून लावीत असे.

तो जायला निघाला. नोकराने सामान आणून गाडीत ठेवले. देवदत्तने आई-वडिलांचा निरोप घेतला. " बहुतेक एक वर्ष लागेल मला परत यायला. अधूनमधून येत राहीन. "

त्याची गाडी निघाली. गाडीत बसल्याबसल्या देवची तंद्री लागली. आई सदाच सुनेचा विचार करून घाबरते. आता घरी परत गेलो की आधी लग्नाचे पाहा म्हणतो. म्हणजे ती जरा सुखावेल. आठ तासात औरंगाबाद आले. तिथे त्याने चहा, जेवण घेतले. दुपारचे चार वाजायला आले होते. तेथे उतरून त्याने भयाणवाडीची चौकशी केली. तिथे कळले की वैजापूरपासून १२ किलोमीटरवर भयाणवाडी आहे. त्याची गाडी वैजापूरच्या दिशेला निघाली.

सायंकाळी ६.३० ला वैजापूरमधे पोचल्यावर त्याने आपल्या सहकाऱ्याला, म्हणजे सुनीलला फोन केला. जो उत्खननाच्या साईटवर त्याच्या बरोबर असणार होता. त्याने सांगितले , " मी उद्या संध्याकाळपर्यंत वैजापूरला पोचतो. तू आज रात्री तिथेच गेस्टहाऊसला मुक्काम कर. उद्या आपण दोघे मिळून साईटवर जाऊ." याला मान्यता दर्शवत देवदत्त सरकारी गेस्ट हाऊसमधे थांबला. तेथील नोकरांकडून सामान उतरवून घेऊन तो खोलीत गेला. गेस्ट हाऊसची खोली स्वच्छ होती. तेथे टी.व्ही., आलिशान बेड, फ्रीज वगैरे सामान होते. सुंदर बाथरूममधे टबबाथ घेत त्याने प्रवासाचा सर्व शीण घालविला. फ्रेश होऊन बाहेर येताच तिथल्या केअर टेकरने त्याला जेवायला बोलावले.

खास औरंगाबादी बेत होता. भाकरी, येळवणाची आमटी, हिरव्या मिरचीचा खरडा, पिठले, पातीचा कांदा. " साहेब या भागाला उन्हाळा लई जानवतो त्यामुळे आमच्या सगळ्या जिनसांत, जेवनात कांदा असतोच जी. न्हाई म्हणजे जेवान आवडलं न्हवं?" देवदत्त

म्हणाला, " गेनू, आम्ही कोल्हापुरी माणसं आणि कामाच्या निमित्ताने भटकणारे, रांगडे. मग काय जे समोर येईल ते खायचं. बाकी जेवण अगदी फक्कड आहे. उद्या दुपारी पण असंच जेवण बनवायला सांग."

" ठीक आहे." असे म्हणून गेनू आत गेला.

जेवण झाल्यावर शतपावली करण्यासाठी देवदत्त गेनूला सोबत घेऊन गेला. रात्रीचे साडे नऊ वाजत आले होते. खेडेगाव असल्याने सामसूम झाली होती. देवदत्त म्हणाला, " गेनू, उद्या माझा एक सहकारी संध्याकाळी इथेच येणार आहे आणि मग आम्ही दोघे उत्खननाच्या साईटवर जाणार आहोत. इथे जवळच आहे ते गाव.- 'भयाणवाडी - गावाचे नाव ऐकून गेनूच्या चेहे्ऱ्याचा रंगच उडाला. तो त त प प करू लागला. " स स स साहेब अ अ अ आ आ आपण जाऊ या प प प परत घराकडे. नाय, सखू एकलीच हाय जी घरात." आणि तो देवच्या उत्तराची वाट न बघता गेस्ट हाऊसकडे झपाझप चालू लागला. देव त्याला हाक मारत त्याच्या मागे पळत आला. "काय रे गेनू, किती पळायला लावलंस मला, आणि भयाणवाडी हे नाव ऐकताच असा घाबरलास का? तिथे काही खरंच भयानक आहे की काय? हा हा हा हा देव हसत म्हणाला.

गेनू हात जोडून म्हणाला, " साहेब, त्या गावाबद्दल बोलणं तर दूरच, पण त्या गावचं नाव बी घेत नायी जी आम्ही. म्या फकस्त येवढंच सांगतू की त्ये गाव लई चकव्याचं हाय. म्या कवा बी न्हायी गेलो जी तिकडे पण आय, आजी सांगायची, निसतं त्या गावाचं नाव बी घेतलं तरी चकवा बसतूच म्हनायची माझी आजी. आनी तुमी तर तिकडं जानार म्हणता जी आताच इचार बदला सायेब. येळ गेलेली न्हाई . अजून तुमचं सारं व्हायचं, जायचं. कशापायी जिवाशी खेळताय?" देव अवाक होऊन ऐकत होता. त्याने मनात विचार केला, "काय रे ही अंधश्रद्धा. " पण वरकरणी गेनूला म्हणाला, " ठीक आहे गेनू, काळजी करू नकोस. झोप जाऊन." गेनू मान हलवून निघाला आणि परत काहीतरी अचानक आठवल्यासारखा पटकन म्हणाला, " साहेब, हितं तो जिरूचा बल नाही.मिलत. आज रातच्याला टुपलाइट चालूच राहू द्या. तोंडावू पांगरून घ्या मंग सोप लागल." ते ऐकून देव झोपायला गेला. त्याच्या खोलीच्या बाहेरच बिछाना टाकून गेनूही झोपला.

रात्री दोनच्या सुमारास गेनूला कोणाचातरी आवाज आला. तो व्यवस्थित जागा झाला तर तो देवचा आवाज होता. तो गेनूलाच हाक मारीत होता. गेनू धाडकन दार उघडून आत गेला तर आत पूर्ण अंधार. काहीच दिसत नव्हते. " काय जालं जी?" गेनूने विचारले. देव उत्तरला, " अरे लाईट गेले बहुधा. कंदील लाव बघू." गेनू म्हणाला, " सायेब बाहेर तर हाये लाईट. म्या बगतो थांबा." म्हणत त्याने दारामागील लाईटच्या बटनाला हात लावला. " सायेब, बटनच बंद हाये." असे म्हणत त्याने बटन दाबले आणि क्षणात प्रकाश पडला. मग पंखाही चालू झाला. " आता चालू जाला बगा सायेब." असे म्हणताना त्याचे लक्ष देवचा बेड जिथे होता तिथे गेले. समोरील दृश्य पाहून गेनू हादरलाच. बेडवर देवदत्त नव्हता आणि बेड भिंतीला टेकून उभा केलेला होता. देवदत्त खाली गाढ झोपला होता. ना अंथरूण, ना पांघरूण. त्याच्या अंगावर लज्जा रक्षणार्थ एकच कपडा शिल्लक होता. त्याचे बाकीचे कपडे उभ्या केलेल्या बेडवर देव झोपलेल्या आकारात होते. गेनू जाम घाबरला पण काय करायचे हे त्याला माहिती होते. त्याने झपाट्याने जय हनुमान जय हनुमानचा जप चालू केला. एका क्षणात बेडवरचे देवचे कपडे खाली पडले आणि खिडकीची तावदाने वारा नसतानाही हलू लागली. देवही जागा झाला.

गेनूला दरदरून घाम फुटलेला आणि तो जय हनुमानचा जप करायचा थांबेना. देव उठलेला पाहून त्याने त्याला ओढत बाहेर आणले आणि आहे त्या अवस्थेत आपल्या खोलीतल्या देवघरापाशी नेले. आता वातावरण जरा शांत झाले होते. देवने विचारले, " काय झालं रे नक्की ? आणि माझे कपडे कुठे आहेत ? मी खाली कसा झोपलो होतो? " गेनूने त्याला अंगावर ओढायला एक उपरणे दिले आणि घडलेली सर्व हकीगत सांगू लागला. या आधी असे कधीच घडले नाही हेही त्याने सांगितले. त्याने देवला परत त्याच्या खोलीत नेले आणि उभा केलेला बेड दाखवला, त्याचे कपडे पण दाखवले. देव थोडा अस्वस्थ झाला पण घाबरला नाही. तो परत झोपायच्या तयारीत होता. तितक्यात गेनू, " आत्ता येतो" असे म्हणून परत देवघरात गेला. तेथून श्री हनुमानाची एक छोटीशी तसबीर आणून देवच्या हातावर ठेवून म्हणाला, " हे उशाशी ठेवून झोपा." देव ठीक आहे म्हणून झोपला. त्याला आता शांत झोप लागली.

सकाळी दहा वाजता तो उठला. रात्रीच्या प्रकाराने त्याला थोडा तणाव वाटत होता. आंघोळ करून आवरून तो खोलीच्या बाहेर आला. गेनू त्याची वाटच पाहात होता. " आवरलं जी? न्हाई म्हंजे परत नीज आली न्हवं? म्या म्हटलं हुतं ना सायेब आता किरपा करून त्या गावचं नाव बी घीऊ नगा आन तकडं जाऊ बी नगा. आवं तकडं गेलेला कोन बी परतून न्हाई आला जी."

" गेनू, सरदेशमुखांचं रक्त वाहातंय अंगात. घाबरणाऱ्यातलं नाही ते. आणि अंबाबाईचा आशीर्वाद पण आहे माझ्या पाठीशी. तिथे जाऊन माझं काम संपवूनच परत येईन. काळजी करू नकोस." गेनू घाबरून बोलला, " सायेब म्या पडलो नोकर मानूस. तुमच्या मनाला येईल तसं करा जी. पर माज्या बरूबर एकदा चला. " असे म्हणत तो देवला ओढत मारुतीच्या मंदिराकडे घेऊन गेला. मारुतीचे दर्शन घेऊन निघणार तोच तिथे बाहेर एक साधू बाबा भेटले. ते देवदत्तकडे पाहून म्हणाले, " थांब. तू तुझ्या कार्यात यशस्वी होणार आहेस. पण आत्ताच सांगतो. तुला बळ देणारा आहे हा मारुती. रोज याचं स्मरण करीत जा. आणि तेथून परत येईपर्यंत तू पूर्ण ब्रम्हचर्य पाळायचं आहे. अगदी तुला तेथे मेनका, उर्वशी, रंभा जरी भेटल्या तरी तू बळी पडणार नाहीस असं वचन दे मला."

देवदत्तला हे थोडे हास्यास्पद वाटले. पण तसे काहीही न दर्शवता त्याने साधूबाबाला तसे वचन दिले. साधू बाबांनी त्याच्या डोक्यावर हात ठेवला आणि मंत्र म्हणू लागले. " तुझ्यावर संकटं येणार आहेत पण तू सारी पार करशील. तू फार मोठी कामगिरी करायला निघाला आहेस. यशस्वी हो." असे म्हणून साधू बाबांनी एक मंत्र त्याच्या कानात सांगितला आणि म्हणाले जेव्हा केव्हा तुला वाटेल की तू संकटात आहेस तेव्हा या हनुमानाचे स्मरण कर आणि या मंत्राचा जप करायला लाग. मी तिथे तुझ्या मदतीला हजर असेन. मात्र हा मंत्र कोणालाही सांगू नकोस. हनुमान तुझे रक्षण करो. "

देवने साधूबाबांना नमस्कार केला आणि स्वत:च्या हातातील सोन्याची अंगठी, जिच्यावर सूर्याची प्रतिमा होती आणि एक पोवळे होते, त्या साधू बाबांना देऊन निघून गेला. संध्याकाळी सुनील आला. चहा झाल्यावर दोघेही गेनूचा निरोप घेऊन आणि एकदा मारूतीचे दर्शन घेऊन निघाले. जाताजाता देवने काल रात्री घडलेला प्रकार सुनीलला सांगितला. त्यावर सुनीलने हसून प्रतिक्रिया व्यक्त केली. " अरे हे सारे त्या गेनूचेच काम असणार. लिहून घे." हा हा हा हा दोघांतच चांगलाच हशा पिकला.

सात किलोमीटर अंतर गेल्यावर त्यांना एक झोपडी दिसू लागली आणि ते जसजसे त्या झोपडीच्या जवळ जाऊ लागले तसतशी त्यांना एक म्हतारी दिसू लागली. सूर्याने मावळतीला कलटी मारली होती. म्हातारीने त्यांना थांबण्याचा इशारा केला. काही मदत हवी असावी म्हातारीला असे वाटून देवने गाडी थांबवली आणि गाडीच्या काचा खाली केल्या. म्हातारीने त्यांना खाली उतरण्याचा इशारा केला.

ते उतरताच तिने त्यांना तिला नमस्कार करण्याचा इशारा केला. मग म्हणाली, " तुम्ही तुमच्या कार्यात यशस्वी व्हाल. मला तुमच्या मदतीची नाही तर तुम्हाला माझ्या मदतीची गरज आहे. " ती देवदत्तकडे पाहात बोलली. त्याला तिचा इशारा कळला. तो म्हणाला, " आजी, मला वाटतं की तुम्हाला पुढे जायचं आहे म्हणून तुम्ही गाडी थांबवत आहात."

त्यावर म्हातारी गडगडून हसली आणि म्हणाली, " बेटा, पुढे जाणं तुझ्या नशीबात आहे. तूच जा. तिथे कदाचित तुझ्या राहाण्याची व्यवस्था करून ठेवली असेल. पण भुलू नकोस कशालाही आणि कोणालाही. अंगठीच्या बदल्यात जे काही मिळाले आहे ते नीट लक्षात ठेव. आणि ती मारूतीची तसबीरपण नीट ठेव हृदयाशी. जा आता, माझे काम झाले. तू सकाळीच पोचणार आहेस तिथे ठाऊक आहे मला. हे घे. भाकरी आणि ठेचा. दोघे खा आणि पाणी प्यायचं झाल्यास फक्त तुमच्या जवळचंच प्या. कितीही मोठे संकट आले तरी तुमचं ठिकाण आल्याशिवाय खाली उतरू नका. कारण इथून पुढे तुम्हाला हे सर्व सांगायला कोणी नसेल. निघा आता."

देवने आणि सुनीलने तिचे आभार मानले आणि ते पुढे निघाले. ते दोन किलोमीटर गेले असावेत. वाटेत एक भले मोठे झाड आडवे पडलेले होते. जायला वाटच नव्हती. " शिट यार, फक्त ५ किलोमीटर राहिले आहे ते गाव आणि आपण इथेच अडकलो आहोत. च्यायला, ती म्हातारी म्हणालीच होती की तुम्हाला सकाळ होईल तिथे पोचायला. याचा अर्थ तिला माहित होतं की झाड आडवं आहे रस्त्यात ते. थांगपत्ता लागू दिला नाही तिने आणि वर भाकरी, ठेचा दिला खायला. चल सुन्या खाऊन तरी घेऊ या थोडं थोडं "

दोघांनी एकेक भाकरी आणि ठेचा खाल्ला आणि गाडीतच निवांत टेकले. झाड फार प्रचंड होते. दोघांनी मिळून हलवायचा प्रयत्न जरी केला असता तरी तिळभरही सरकले नसते. त्यामुळे मदतीसाठी फोन करून ते गाडीतच शांत बसले. सर्व परिसरात अंधार, गडद अंधार. एकदम शांतता, भयाण शांतता. काजव्याचाही प्रकाश नाही.

वारादेखील नाही. मग हे झाड पडले तरी कसे? आता त्या दोघांना थोडी अस्वस्थता जाणवू लागली होती. अचानक वारा सुटला. पाऊस पडायला लागला. सुनील म्हणाला, " चल देव जरा पावसात तरी भिजू. " दोघेही गाडीतून खाली उतरणार तोच समोर तीच म्हातारी पावसात उभी दिसली. ती तेथून जोरजोरात हात हलवून उतरू नका असा इशारा करीत होती. मग त्यांनी तिला गाडीकडे बोलावले आणि गाडीत बसायला सांगितले. ती पण गाडीत मागच्या सीटवर बसली. तिला गाडीत बसण्यासाठी जेव्हा गाडीचे दार उघडले तेव्हा दोघांनाही कोणीतरी स्त्री जोरजोरात भयानक हसत असल्याचा आवाज आला. म्हातारी पटकन गाडीत बसली. ती पदराने तोंडावरचे पाणी टिपत बोलू लागली.

" सांगितलं होतं ना काहीही झालं तरी गाडीतून उतरायचं नाही म्हणून ? मग का प्रयत्न केलात? जीव घालवायचा आहे का? अशा खूप अडचणी येणार आहेत. रस्ते तुम्हालाच शोधायचे आहेत. थोडक्यात सांगते, तुम्ही ज्या ठिकाणी निघाला आहात ते काही साधं ठिकाण नाही. अत्यंत भयानक ठिकाण आहे." म्हातारी सांगत असतानाच पावसाचा जोर वाढला. " शंभर एक वर्षांपूर्वी इथे भूकंप झाला होता. त्यात सर्व गावच्या गाव जमीनदोस्त झालं होतं. कोणाचाही मदतीचा हात आला नाही. त्यामुळे सर्व गावात कोणीच वाचलं नाही. असं म्हणतात की तिथे फक्त भुतं वास करतात."

आता गारांचा आवाज येऊ लागला. सुनील म्हणाला, " यार देव, पावसाचं वातावरण नसताना हा गारांचा पाऊस, जरा विचित्र नाही वाटत?" " आता अशा विचित्र वातावरणाची सवय करून घ्या." म्हातारी म्हणाली. वाऱ्याने गाडी जोरजोरात हलू लागली. सर्व जण सीटला घट्ट पकडून बसले. आता गाडी आपोआपच हवेत उचलली गेली. देव आणि सुनील जाम घाबरले. तितक्यात देवला काहीतरी आठवले. त्याने गेनूने सांगितलेला ' जय हनुमान, जय हनुमान' जप करायला सुरुवात केली. गाडी दाणकन जमिनीवर आपटली आणि स्थिर झाली. म्हातारीने त्याला शाबासकी दिली. " असंच बेटा, असंच लढ आणि यशस्वी होऊन परत ये. पुढे काय करायचं आहे याचा मार्ग तुझा तुलाच सापडेल. आता हे झाड गाडीतून न उतरता पार कर."

देव आश्चर्याने म्हणाला, " न उतरता ? ते कसं?" ती म्हणाली, "

तोच जप म्हणत पुढे चल आणि गाडी झाडावरून घालवायचा प्रयत्न कर. आणि हं. पुढे गेल्यावर गाडी थांबव. मला इथेच उतरायचंय." देवने घड्याळात पाहिले.

रात्रीचा एक वाजला होता. त्याने स्टार्टर मारला. क्लच दाबून पहिला गियर टाकला आणि हँड ब्रेक काढून गाडी हळूहळू पुढे घेतली. आता झाडात आणि गाडीत फक्त दोन हातांचे अंतर होते. दुसरा गियर टाकताच गाडीचा वेग वाढला आणि ती झाडाला धडकून झाडाच्या पलीकडे निघून गेली. काय होते आहे हे कोणालाच काही कळेना. देवचा जप चालूच होता. गाडी अलगद पुढे आली. सुनील आणि देव एकमेकांकडे भांबावलेल्या चेहेऱ्याने पाहू लागले. देवने गाडी रस्त्याच्या कडेला घेतली आणि थांबवून म्हणाला, " आजी उतरा." त्याला मागून काहीच उत्तर आले नाही. तो परत म्हणाला, " आजी, उतरायचंय ना? " आजी काहीच उत्तर देत नाही म्हणून दोघांनी झटकन मागे वळून पाहिले. मागे कोणीच नव्हते. आजी गायब झाली होती.

दोघे परत खूप घाबरले. दहा मिनिटे थांबून दोघे पुढे निघाले. त्यांनी आता मनाशी पक्के केले की आपल्याला आजीने क्ल्यू दिलाय की घाबरायचे नाही. चला, देवने गाडी स्टार्ट केली आणि समोरच्या आरशात पाहिले. आजी आरशातून त्याच्याकडे पाहून हसत होती. त्याने झटकन मागे पाहिले. कोणीच नव्हते. त्याने परत आरशात पाहिले. आता तिथेही कोणी नव्हते. काहीही न बोलता त्याने गाडी हळूहळू पुढे घेतली.

दीड वाजून गेला होता. गडद अंधाराव्यतिरिक्त काही नव्हते आजूबाजूला. दोन किलोमीटर पुढे येतो तो वाटेत एक ओढा लागला . त्यावर पूल होता आणि ओढा गच्च भरून वाहात होता. बघताबघता पुलावरून पाणी ओसंडून वाहू लागले. पाण्याची पातळी झपाट्याने वाढत होती. देवला गाडी थांबवावीच लागली. हळूहळू पाणी रस्त्यावर सगळीकडे वाहू लागले. पाण्याची पातळी इतकी वाढली की आता अर्धी गाडी पाण्यात होती. " हे काहीतरी विचित्र घडतं आहे देव, काहीतरी कर. आजीला आठव. तिचा मागचा तोडगा आठव." क्षणभरही वेळ न दवडता देवने ' जय हनुमान' चा जप केला. परत निघालेल्या सापाप्रमाणे पाणी सरसर परत गेले आणि रस्ता मोकळा झाला. घड्याळात रात्रीचे तीन वाजले होते. सुनील म्हणाला, " देव, आपल्याला आजीने सांगितलं आहे की गाडीच्या बाहेर पडायचं नाही. अजून तीन किलोमीटर जायचं आहे. पुढे आणखी नवीन संकटाला तोंड देण्यापेक्षा आपण इथेच थांबू. सकाळ झाली की मगच पुढे जाऊ. " देवने आपली संमती दर्शवून गाडी तिथेच बाजूला घेतली. त्याच्या अचानक लक्षात आले की गाडीत ' हनुमान चालीसा' ची सीडी आहे. त्याने ती लावली. ती सीडी चालू ठेवून दोघेही गाडीतच झोपी गेले. त्यांना झोपही लागली. मोबाईलचा अलार्म वाजला म्हणून देव जागा झाला. सकाळचे सहा वाजले होते. बाहेर उजाडले होते. त्यांनी गाडीतूनच आजूबाजूला नजर

टाकली. सर्वत्र उजाड माळरान होतं आणि ना झाड होतं, ना गवत, ना ओढा. आणि नुकताच पूर येऊन गेल्याचाही काही पुरावा नव्हता. एक सुस्कारा सोडून देवने गाडी सुरू केली आणि पुढे निघाला. केवळ दहा मिनिटात ते - भयाणवाडी ० किमी. - च्या पाटीजवळ येऊन थांबले. आजूबाजूला कोणीही नव्हते. ना घर, ना वस्ती, ना चिटपाखरू. फक्त एक भयाण शांतता. गाडी उजवीकडे वळवून त्याने रस्ता पकडला. एक किलोमीटरवर त्यांना एक मोठा वाडा दिसला. त्या वाड्यासमोर देवने गाडी उभी केली आणि हॉर्न वाजवला. आतून एक पन्नाशीचा माणूस बाहेर आला. त्याचा चेहेरा गंभीर होता. त्याने अंगात पारंपरिक कपडे घातले होते. त्याच्या कानात बाळी होती. डोक्याला फेटा होता. हा सकाळी साडेसहा वाजता अशा पोशाखात? जरा नवलच वाटले. त्याच्या मागेच देवने सरकारी गेस्ट हाऊसची पाटी वाचली आणि आपले ठिकाण आले असे समजून दोघे गाडीचे दार उघडून खाली उतरले. तो माणूस पुढे आला. त्याने या दोघांना वाकून नमस्कार केला आणि गंभीरपणे म्हणाला, " तुमचीच वाट बघत होतो. या आत या. तुमचं सामान? " देवने गाडीची डिकी उघडली. त्या माणसाने दोघांचे सामान आत ठेवले.

वाड्यात प्रवेश करताच दोघांनीही आधी आपली आन्हिके आटोपली. तेवढयात ' तो ' आला. त्याने आपली ओळख करून दिली. " मी गुलाब, इथला केअर टेकर आहे. इथे मी, माझी बायको आणि माझ्या दोन मुली राहातो. "

देव हसून म्हणाला, " चहा मिळेल?"

त्यावर गंभीर चेहेऱ्याने हं म्हणून तो गेला. तो चहा घेऊन आला. देवने त्याला बसायला सांगितले.

चहा पीतपीत तो त्याची चौकशी करू लागला. " गुलाबराव, तुम्ही किती वर्षं झाली इथे राहाताय?"

गुलाब म्हणाला, " पहिल्यापासनं इथेच आहोत आम्ही. "

देवदत्तने विचारले, " तुम्ही मूळचे इथलेच का?"

गुलाब म्हणाला, " नाही. आम्ही मूळचे साताऱ्याचे काटे. आमचे वडील इथेच केअर टेकरचे काम करीत इंग्रजांच्या काळात. आता मी पाहातोय. गावी रग्गड शेती आहे.

भाऊच बघतो. हे गेस्ट हाऊसही आमचंच झालंय. सरकार आम्हाला त्याचं भाडं देते महिना ३०,०००/- रुपये. बक्कळ झाले. मुलींची लग्नं चांगल्या खानदानात झाली की काही नको आम्हाला."

" आम्ही कोल्हापूरचे देशमुख. "

" आणि मी सुनील आंगरे, मी पुण्याचा."

त्या दोघांनी आपली ओळख करून दिली.

" बरं साहेब, तुम्ही आंघोळी करून जरा विश्रांती घ्या. तोवर जेवण बनवायला सांगतो. "

हे बघ गुलाब ,जेवण झाल्यावर तू जरा आमच्याबरोबर बाहेर येशील? गाव पाहून यायचंय. " गुलाब फक्त मान डोलवून गेला.

दोघे आपापल्या खोल्यात गेले आणि आंघोळ करून झोपले. देवला स्वप्न पडलं. तो मोठया गर्दीच्या ठिकाणी गेला आहे आणि तिथे त्याला एक तरुणी पाठमोरी दिसली. त्याने तिच्या जवळ जाऊन पाहिले तर ती तरुणी नसून एक झाड होते. त्याने आजूबाजूला पाहिले. कोणी नव्हते फक्त दाट जंगल होते. देव जागा झाला. घडयाळात दुपारचा पाऊण वाजला होता. त्याला उगाचच वाटले की खोलीच्या खिडकीतून कोणीतरी डोकावते आहे. त्याने तिकडे जाऊन पाहिले. तिथे कोणीच नव्हते. नंतर त्याच्या लक्षात आले की ती खिडकीच्या शेजारच्या झाडाची फांदी त्याला दिसली होती. तो खाली आला.

जेवायला बसणार इतक्यात त्याला त्या मंत्राची आठवण झाली. तो तिथेच बैठकीवर बसल्याबसल्या डोळे मिटून जप करू लागला. जप करताना त्याला असे जाणवले की त्याच्या आजूबाजूला कोणीही नाही. तो एकटाच भयाण शांततेत जप करतोय. त्याने खाडकन डोळे उघडले तर सर्व जण तिथेच होते. तितक्यात सुनील तिथे आला. दोघे जेवायला बसले. जेवायला मोठमोठी चांदीची ताटे, तसेच पेले आणि वाट्या . राजेशाही थाट. जेवणपण सुग्रास होते. दोघेही पोटभर जेवले.

" गुलाबराव, जेवण मस्त होतं. आता तुम्ही जेवून घ्या मग जाऊ आपण गाव पाहायला. " सुनील आणि देव आवरून गुलाबची वाट बघत बसले. देवने सुनीलला त्याच्या स्वप्नाबद्दल सांगितले. आश्चर्य असे की सुनीललाही तेच स्वप्न पडले होते. देव म्हणाला, "

सुन्या यार, मी खरं तर अंधश्रद्धांवर विश्वास ठेवणारा माणूस नाहीये पण हे काय होतंय तेच कळत नाही. "

सुनील म्हणाला, " देव अंधश्रद्धेवर नको विश्वास ठेवूस. पण माझा श्रद्धेवर खूप विश्वास आहे. तू त्या साधूबाबांवर विश्वास ठेव. गोष्टी व्यवस्थितच घडतील. " चला मालक " म्हणत गुलाब आलाच तेवढ्यात. गुलाब त्यांना गावात घेऊन गेला. गावात सगळे कच्चे रस्ते, ठिकठिकाणी ५ / ६ घरांच्या वस्त्या आणि झुडपे, बास बाकी काही नाही. एक वैशिष्ट्य म्हणजे गावाच्या मधोमध एक टेकडी होती. दहा ते बारा फूट उंच अशा त्या टेकडीवर साधे गवताचे पातेही नव्हते.

" गुलाब, ही टेकडी कसली?"

" ही भुतांची टेकडी आहे मालक. याच्यावर जो जाईल तो परत माघारी येत नाही. म्हणून ही आजूबाजूची लोकं तिथे जातही नाहीत आणि कोणाला जाऊही देत नाहीत. " गुलाबने खुलासा केला. सुनीलने आपल्या जवळची अवजारे बाहेर काढली आणि पायाजवळची जमीन थोडी उकरली. जमिनीतून एक विचित्र उग्र दर्प आला आणि कोणीतरी हसले. " काय झालं गुलाब हसायला?" म्हणून त्याने गुलाबकडे पाहिले. तर गुलाब जवळपास कुठेही नव्हता. दोघे एकमेकांकडे पाहू लागले. तेवढयात जवळच्या झुडपातून गुलाब बाहेर आला. करंगळी दाखवत त्याने झुडपाकडे इशारा केला.

" बरं बरं ठीक आहे. " सुनील बोलला. " काय रे गुलाब, इथे बरेच भयानक काहीकाही आहे म्हणतात. तुला नाही का भीती वाटत इथे?"

गुलाब सांगू लागला, " साहेब खरं सांगू का इथे घाबरण्यासारखं काहीच नाही जी. उगाचच अफवा. त्याचं काय आहे साहेब की सरकार खूप पैसा देतं मंत्र्यांना या गावचा विकास करा म्हणून. आणि तो भूकंप झाला होता ना तेव्हापण अनुदान मिळालं होतं. मग मंत्र्यांनी भरल्या आपल्या तिजोऱ्या आणि गाव तसंच राहिलं. मग सरकारचं स्क्वॉड आलं तपासायला. म्हणून सांगतात की या गावात भुताटकी आहे. म्हणजे कोणी भटकत नाही आणि आला तरी थांबत नाही. ही गोम आहे त्या मागे."

गुलाबचे म्हणणे त्यांना पटले. पाच वाजत आले होते.

गुलाब म्हणाला, " साहेब, चला आता परतायला पाहिजे. " ते परत वाडयावर आले.

" गुलाब, या लोकांचा उदरनिर्वाह कसा चालतो रे?" सुनील.

" साहेब कुठे काटक्या, मोळया ,शेणाच्या गोवऱ्या विकणं, जनावरांना दूध असल्यास दूध विकणं वगैरे वगैरे. माझं तसं नाही बघा. मला छान भाडं मिळतं. फक्त वाडा स्वच्छ करायचा एवढंच काय ते काम."

संध्याकाळी सुनील आणि देव वाडयाच्या बाहेर गप्पा मारत बसले. " सुनील, तुला वाटतं का रे की त्या आजी सांगत होत्या ते, गेनू बोलत होता ते आणि गुलाब सांगतो ते यात काही सांगड आहे?"

देवने शंका काढली. " नाही रे सारं काही भुक्कड, भाकडकथा " सुनील म्हणाला.

अचानक वारा नसताना उगाचच पाने सळसळली. एक अनामिक सळसळ. अंधार पडू लागला होता. एक भयाण शांतता पसरू लागली होती. ती सळसळ अचानक थांबली. कोणीतरी हसल्याचा अगदी भयपटात असतो तसा आवाज आला. दोघेही थोडे अस्वस्थ झाले पण घाबरले नाहीत.

रस्त्यावर लाईट नव्हते. गावात कुठेच लाईट नव्हते. फक्त वाडयात तेवढे लाईट होते. रातकिड्यांची किरकिर ऐकू येत होती. मग घुंगरांचा आवाज ऐकू येऊ लागला. दोघेही इकडे तिकडे शोधू लागले. मग आवाजाच्या दिशेने जाऊ लागले. आवाज वाडयात येत होता. त्या दोघांची चाहूल लागताच घुंगरांच्या पावलांचा वेग वाढला. ते दोघेही भरभर तिकडे जाऊ लागले. शेवटी ती त्यांना वळताना दिसली. मग दोघेही तिच्या मागे पळत सुटले. ती गेली ते स्वयंपाकघर होते. त्यांनी आत जाऊन पाहिले तर तिथे ती नव्हती.

ते तिथून बाहेर पडणार तोच ती अचानक समोर आली. हिरवी नऊवारी साडी, मोठे कुंकू, हिरवा चुडा, असेल पन्नाशीची ठसठ्शीत. " काय पायजे जी? म्या गुलाबरावांची बायको साळू."

" पाणी ... पाणी प्यायचं होतं म्हणून आलो होतो." देव म्हणाला.

" आसं व्हय. आत्ता देते जी " म्हणत तिने त्या दोघांना पाणी प्यायला दिले.

पाणी पितापिता त्यांची नजर समोरच्या दोन स्त्रियांवर पडली. त्या पाठमोऱ्या होत्या आणि काहीतरी काम करत होत्या स्वयंपाकघरात.

" या कोण?" देवचा प्रश्न.

" आमच्या मुली हाईत जी, बाभळी आणि कोरांटी." असे म्हणत तिने त्या दोघींना हाक मारली. त्या दोघी तिथे आल्या. अप्रतिम सुंदर जुळया मुली. अगदी हुबेहूब एकमेकींसारख्या. पाणीदार डोळे, सरळ धारदार नाक, गोरापान खानदानी रंग, हनुवटीवर आणि डोळयाच्या बाजूला तीळ, गुलाबी ओठ, भव्य कपाळ, त्यावर शोभेल अशी चंद्रकोर, सुरईसारखी बारीक आणि उंच मान, गळयात पुतळयांची माळ, गुलाबी चोळया, शेलाटा बांधा, दोन्ही हातात शोभणाऱ्या सुंदर हिरव्या काचेच्या बांगड्या, कमळाच्या देठासारखी नाजूक आणि लांबसडक बोटे, अजिंठ्याच्या शिल्पमूर्तींसारखी ठेवण, पिवळया नऊवारी साडया, पायात तोडे आणि डोक्यावर पदर. अप्रतिम सौंदर्य, हिरकणीसारखं.

त्यांनी " नमस्ते मालक " म्हटल्यावर तर दोघांच्याही काळजावर बाण चालले. दोघेही घायाळ झाले त्या नजरांनी. काय सुरेल आवाज. काय अदब आहाहा ! देवला तर असे वाटले की एकीला पकडून करकचून मिठीत आवळावे. त्याला आजूबाजूचे भानच राहिले नाही.

सुनीलने देवला धपका मारत साळूला विचारले," या दोही जुळया का?" " व्हय जी. " म्हणत तिघीही आत निघून गेल्या. झोपेपर्यंत देव त्या मुलींचाच विचार करत राहिला.

झोपेत त्याला परत एक स्वप्न पडले. त्यात त्या आजी येऊन " ३० दिवस फक्त, ३० दिवस फक्त." असेच म्हणत होत्या. देवला काहीच कळले नाही. त्याने ठरवले की उद्याच आजीला याचा अर्थ विचारून यावे.

दुसऱ्या दिवशी फ्रेश झाल्यावर तो खाली आला आणि चहा, नाश्त्याच्या अगोदर त्याने साधूबाबांचा जप करायला सुरुवात केली. त्याला परत तसेच जाणवले. आजूबाजूला कोणी नाही. फक्त भयाण शांतता. जपासाठी डोळे मिटलेले असताना त्याला डोळयांसमोर काही अक्षरे लिहिलेली दिसली. त्यात लिहिले होते " ३० दिवसात काम संपवून इथून नीघ. नाहीतर मरण निश्चित. " त्याने स्वप्नाचा अर्थ समजून घेतला.

त्याने खोदकामासाठी मजूर मिळतील का याची पाहाणी करायला गुलाबला सांगितले. गुलाबने होकारार्थी उत्तर दिले. गावातले काही लोक कुदळी, फावडी घेऊन आले. दुपारीच खोदकामाला सुरुवात झाली. थोडी जमीन खणल्यावर जुन्या घरांचे अवशेष सापडले. दगड, भांडी, अलंकार असे सर्व सापडू लागले. अचानक खूप हाडे निघायला लागली. जसजशी ती बाहेर काढून टाकली तसतसा हाडांचा ढीग साठू लागला आणि तोच घाणेरडा दर्प येऊ लागला. हाडांच्या ढिगात आपोआप एक हालचाल होऊ लागली आणि आपोआप हाडे सांगाड्यात जुळून नाचू लागली. देव आणि सुनील जोरजोरात पळत होते. सर्व सांगाडे त्यांच्या मागे धावू लागले. तेवढ्यात पुढूनही सांगाडे आले. आता ते दोघे सांगाड्यांनी वेढले गेले. दर्प वाढत होत. उगाचच हसल्याचा आवाज येत होता. दोघांनाही काय करावे सुचत नव्हते.

तेवढ्यात देवने ' जय हनुमान ' चा जप सुरू केला. सर्व सांगाडे गुप्त झाले. संध्याकाळी दोघे वाड्यावर परत आले आणि त्यांनी सर्व हकीगत गुलाबला सांगितली. " काय सांगता जी मालक? म्हणजे या गावाबद्दल बाहेर जे बोलतात ते खरं आहे? माझा तर यावर अजिबात विश्वास बसत नाही. आता मलाही भीती वाटायला लागली आहे. मी उद्याच गावाकडे जातो साळूला घेऊन आणि मांत्रिकाला घेऊन येतो. तो सगळं थांबवेल आणि तुमची कामंही वेगात होतील. मी आणि साळू गेलो तरी माझ्या पोरी आहेत इथे. त्या घेतील काळजी तुमच्या व्यवस्थेची. "

दोघांच्याही मनात आनंदाने सनई वाजू लागली. त्यामुळे मांत्रिक बोलवायची इच्छा नसूनही ते गुलाब आणि साळूला सोडायला तयार झाले. पण तसे काही चेहेऱ्यावर न दाखवता देव म्हणाला, " तुमच्या पोरींना जमेल हे सगळं? येवढ्या हुशार आहेत त्या?"

गुलाब म्हणाला, " साहेब, त्या साळूपेक्षाही फार हुशार आहेत. जुळ्या आहेत ना त्यामुळे एकमेकींवर खूप जीव आहे त्यांचा. उजव्या डोळयाला तीळ आहे ती बाभळी

अणि डाव्या डोळयाला तीळ असलेली कोरांटी. आता जेवण करून झोपा साहेब. आम्ही पहाटेच निघतो बघा दोघं. " दमल्यामुळे दोघांनाही शांत झोप लागली.

दुसऱ्या दिवशी आवरून खाली आल्यावर त्या दोघी समोर हजर होत्या. . चहा, नाश्ता तयार होता. आज लाल नऊवारी नेसल्या होत्या दोघी. तशाच अप्रतिम दिसत होत्या. काहीही बोलत नव्हत्या. देवची नजर कोरांटीच्या मुखावर खिळली होती तर सुनीलची बाभळीच्या.

काहीतरी बोलायला हवे म्हणून देव बोलला, " तुम्हाला बोलायची परवानगी नाही का?" "

लाजून कोरांटी म्हणाली, " तसं न्हाई जी."

मग सुनील चेष्टेच्या मूडमधे येऊन म्हणाला, " मग कसं हाय जी? का सुंदर मुलींना बोलतं करायला काही करार करावा लागतो ? "

त्या दोघी हसून लाजून निघून गेल्या. हे दोघे त्यांच्या मागेमागे स्वयंपाकघरापर्यंत गेले तर त्या आपसात कुजबुजत होत्या. चार पाच दिवसात त्यांची चांगली मैत्री जमली त्या दोघींबरोबर. मैत्रीपेक्षा थोड्या जास्त आणि प्रेमापेक्षा थोड्या कमी अशा भावना त्यांच्या मनात निर्माण झाल्या होत्या. चौघांचीही तीच परिस्थिती होती.

एका संध्याकाळी देव सुनीलला म्हणाला, " सुन्या मला ही कोरांटी खूप आवडली. मी लग्न करीन तिच्याशी. ' अचानक पानांची सळसळ वाढली आणि तोच दर्प परत आला. दोघे आत गेले आणि त्यांनी वाड्याचे दार बंद केले. मांत्रिक येईपर्यंत बाहेरचे काम बंदच पडले होते. दहा दिवस उलटून गेले तरी गुलाबचा काही पत्ताच नव्हता.

त्याच रात्री देवला एक कल्पना सुचली. त्याने कोरांटीला एक ग्लास दूध त्याच्या खोलीत आणायला सांगितले. दहा वाजले होते. कोरांटीने दुधाचा ग्लास घेऊन देवच्या खोलीच्या दारावर टकटक केले. देवने दार उघडले आणि तिला आत बोलावले. दुधाचा पेला ठेवून ती निघणार तोच देवने तिचा हात पकडला. ते नाजूक मनगट, तो मऊसूत स्पर्श, तिने आपला हात सोडवला.

तो म्हणाला, " कोरांटी बस, मला तुझ्याशी काही बोलायचं आहे. " ती लाजतच बसली. कदाचित तो काय बोलणार याची कल्पना तिला त्याच्या नजरेतून आली असावी. त्याने तिला बेडवर स्वत:च्या शेजारी बसवले आणि म्हणाला, " कोरांटी तू मला फार आवडलीस. मला तुझ्याशी लग्न करायची इच्छा आहे. तुला आवडेल का माझ्याशी लग्न करायला?" कोरांटी लाजून लाललाल झाली होती. तिने मानदेखील वर केली नाही. त्याने तिच्या हनुवटीला धरून तिचा चेहेरा वर केला आणि परत तोच प्रश्न विचारला. तिने फक्त डोळयांनी होकार दिला. त्याला फार आनंद झाला. त्याने तिला हळूच आपल्या कवेत घेण्याचा प्रयत्न केला. त्याने तिला मिठीत घेताच त्याला असंख्य काटे टोचल्याचा भास झाला. त्याने झटकन तिला दूर केले पण काही बोलला नाही.

" मी गुलाबरावांशी याबद्दल बोलेन" असे म्हणून त्याने तिला जायला सांगितले. ती जाताच त्याच्या कानात ' ब्रम्हचर्य, ब्रम्हचर्य' असे शब्द घुमू लागले आणि तो एकदम भानावर आला. ' हे मला काय झालं? मी असा का वागलो?' तो मनाशी विचार करू लागला. त्या रात्री त्याला स्वप्नात परत तेच दिसले. आजी ओरडून ओरडून सांगत होती, " फक्त दहा दिवस. नाहीतर .......... "

तो दचकून उठला. मग मात्र त्याला झोप लागली नाही. त्याने सुनीलला ही सारी गोष्ट सांगितली आणि आता लवकरात लवकर उत्खनन संपवायचे असे ठरवले.

त्या दिवशी दुपारी त्यांनी मांत्रिक, गुलाब यांची कोणाचीही वाट न पाहाता उत्खनन चालू केले. परत तेच. जुन्या घरांचे अवशेष, भांडी, हाडे येऊ लागली. परत हाडांचा ढीग साठू लागला. हाडांचा ढीग साठला तसे ते दोघे मागे सरकले. आता ते हळूहळू मागेमागे जात गावाच्या मधोमध असलेल्या टेकडीकडे पळत सुटले. हाडांचे सापळे त्यांच्या मागे येतच होते. मधेच दोन मोठया काटेरी वेली जमिनीतून सरसरत वर आल्या आणि दोघांचे पाय बांधले गेले. आता वेली हळूहळू मोठया होऊ लागल्या आणि दोघांच्या संपूर्ण शरीराला विळखा घालू लागल्या. त्यांना काटे टोचून असह्य वेदना होऊ लागल्या. ते दोघेही विव्हळू लागले होते. त्यांच्या अंगातून रक्त येऊ लागले. ते बेशुद्ध पडण्याच्या मार्गावर होते. आपली शुद्ध हरपता हरपता देव ' जय हनुमान' चा जप करू लागला. सुनीलनेही तेच केले. हळूहळू काटेरी विळखा सैल झाला आणि जमिनीत लुप्त होऊन गेला. दोघेही बेशुद्ध होऊन खाली

पडले. संध्याकाळचे सात वाजले होते. देव आणि सुनील दोघांनाही शुद्धच नव्हती. त्यांच्या आजूबाजूलाही कोणी नव्हते. त्यांचे सारे शरीर रक्ताने माखले होते.

सकाळची उन्हे तोंडावर आली तेव्हा देवला जाग आली. दोघेही एका वेगळ्याच ठिकाणी होते. कधीही न पाहिलेल्या ठिकाणी. आपण उंचावर असल्याचा भास त्याला होत होता. त्याने सुनीलला जागे केले. त्यांना कालची घटना आठवली. त्यांनी आपले कपडे पाहिले. ते रक्ताने माखलेले तर होतेच पण काट्यांमधे अडकून फाटले पण होते. " आपण इथे आलो कसे देव?" सुनीलने शंका काढली. "एवढे काटे टोचूनही आपल्या अंगावर एक साधा ओरखडाही नाहीये पाहिलंस का?" देव म्हणाला, " हो यार, कोणतीतरी दैवी शक्तीच आपल्याला इथे घेऊन आली हे नक्की. " सुनील म्हणाला.

तितक्यात " श्रीराम जय राम जय जय राम " म्हणत वैजापूरचे साधूबाबा दोघांसमोर प्रकट झाले. " स्त्री स्पर्शाची आसक्ती. होय ना?" देवकडे पाहत ते बोलले. " काय बजावलं होतं आठवतंय ना? ब्रम्हचर्य पाळ असं सांगूनही तुझ्या मनात पाप आलंच ना? आजीने काय सांगितलं होतं तेही विसरलास. भुलू नका म्हणाली होती ना?" बाबा रागात बोलले. त्यांचे पाय धरून देवने त्यांची क्षमा मागितली. " आता नीट ऐका, हा डोंगर हेच तुमचं सुरक्षा स्थान आहे. तुम्हाला दोघांनाच हा उकरायचाय. तुम्ही आत्ताच्या आत्ता हे काम सुरू करा. " पण बाबा हा एवढा मोठा डोंगर आम्ही दोघांनीच उकरणं कसं शक्य आहे? मी गावातले मजूर बोलवतो." बाबा जोरात ओरडले. " नाही. इथे कोणीही येणार नाही. ही अवजारं घ्या आणि कामाला सुरुवात करा. लगेचच. " असे म्हणत बाबांनी दोघांना दोन कुदळी दिल्या आणि एका ठिकाणी एक रिंगण आखून दिले. " इथे खोदा."

दोघांनी खोदायला सुरुवात केली. काम अवघड होते पण सुरुवात केली. दुपार होईपर्यंत फक्त हातभरच खणून झाले. परत थोडे खोदकाम करताच धातूचे चमकदार काहीतरी दिसले. त्यांनी वेगात खणायला सुरुवात केली. तो भाग अजून बाहेर येत गेला. आता तो भाग पूर्ण बाहेर आला होता. तो कळस होता. एका मंदिराचा कळस. साधूबाबांनी दोघांना बाजूला सारत त्या कळसावर आपल्या कमंडलूतील पाणी शिंपडले आणि रुद्र म्हणायला सुरुवात केली. तसे ते मंदिर हळूहळू टेकडीतून वर येऊ लागले. त्यांना खूप लोक किंचाळल्याचा आवाज येऊ लागला. जोरजोराच्या किंकाळया, रडण्याचा आवाज, सोडा

सोडा असा आवाज, बाबांनी त्याकडे दुर्लक्ष करायला सांगितले. रुद्र पूर्ण व्हायच्या आतच मंदिर पूर्ण बाहेर आले होते. आत चार मोठी शिवलिंगे होती. चार रंगांची चार. पांढरे, पिवळे, लाल आणि काळे. ब्राम्हण लोक प्रामुख्याने पांढऱ्या रंगाच्या शिवलिंगाची पूजा करीत असत. वैश्य लोक पिवळया आणि क्षत्रिय लोक लाल. आवारात बाहेर मोठा नंदी होता. कोरीव काम केलेले फार सुंदर मंदिर होते ते. आत मोठमोठया पायऱ्या होत्या.

" आता तुम्हाला कोणताही धोका नाही. " असे म्हणून बाबा गुप्त झाले. देव आणि सुनीलने मंदिरातच असलेल्या पुष्करिणीत आंघोळ केली. विशेष म्हणजे पुष्करिणी जमिनीखाली असूनही तिचे पाणी गढूळ झालेले नव्हते. शंभू महादेवाची किमया न्यारीच. त्यांनी मंदिर स्वच्छ झाडले आणि महादेवाला अभिषेक केला. आता वातावरण प्रसन्न वाटत होते. आता त्यांना वाडयावर परत जाऊन जेवायचे होते. कालपासून पोटात अन्न नव्हते. ते जाऊ लागले. गावात ज्या छोट्याछोट्या वस्त्या होत्या त्या गायब झाल्या होत्या. तिथे फक्त वाळलेली काटेरी झाडे होती.

ते लगबगीने वाडयाच्या दिशेने आले आणि समोरचे दृश्य पाहून आश्चर्यचकीत झाले. तिथे वाडा नव्हताच. एके ठिकाणी त्यांचे सामान एका दगडावर ठेवलेले होते. तिथे त्यांची गाडी होती आणि तीन वाळलेली काटेरी झुडपे होती. एक गुलाबाचे पण फूल नसलेले फक्त काटेच, दुसरे बाभळीचे आणि तिसरे कोरांटीचे. शेजारीच एक साळू मरून पडलेली होती. सर्व वाळलेली काटेरी झुडपे पेटवून देऊन दोघेही गावाच्या बाहेर पडले. वाटेत आजीच्या झोपडीजवळ थांबले. ते जवळ जाताच झोपडी अदृश्य होऊन तिथे एक सुंदर तुळशीचे झुडूप दिसू लागले. दोघेही तुळशीला नमस्कार करून पुढे वैजापूरला गेले. तिथे मारुतीच्या मंदिरात गेले. ते साधूबाबांना शोधत होते. ते कुठे दिसले नाहीत. दर्शनाला गाभाऱ्यात गेले.

दर्शन घेऊन निघणार तोच देवच्या लक्षात एक गोष्ट आली.

त्याने साधूबाबांना दिलेली अंगठी हनुमंताच्या मूर्तीवर चिकटून बसली होती.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? कथा, कादंबरी, अध्यात्म, इतिहास, संस्कृती, कला, विज्ञान, ललित अशा सर्वच विषयांवर. एकाहून एक भारी. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! त्यांना वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भॆट द्या. त्यानंतर तुम्ही रोजच या पोर्टलला भेट देत रहाल याची खात्री आहे.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान